REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख २१ डिसेंबर, १९४९ अंक ४९

दी
## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

स्थापनाः १९२६.

मुख्य कचेरी :

सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट–(१०) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

## दि सांगली स्टेट सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,९३,५०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,१४,२३० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,५४३ रु. |
| खेळतें भांडवल | १५,५१,०८८ रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक–हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर — भ. अं. दप्तरदार, बी. ए., चेअरमन.

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखाः–९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. –एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.– ब्रँच सेक्रेटरी

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

## पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

**केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.**


## विविध माहिती

**बिहार सरकारची योजना**—बिहार सरकारनें प्रांतांतील खनिज संपत्ती शोधण्यासाठी १० वर्षें कालावधीचा एक कार्यक्रम आंखला आहे. भूगर्भांतर्गत खनिजांच्या शोधासाठी दरवर्षी २,१९,००० रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. खनिज द्रव्यें सांपडण्यासारख्या १०,००० चौरस मैल प्रदेशाची तपासणी करण्यांत येणार आहे.

**मोहेन–जो–दारो येथें विमानतळ**—सिंध प्रांताचें सरकार मोहेन–जो–दारो येथें एक विमानतळ बांधणार आहे असें समजतें. मोहेन–जो–दारो येथील प्राचीन संस्कृतीचे अवशेष पहाण्यासाठी अधिक परदेशीय प्रवासी यावे म्हणून हें काम करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. विमानतळाशेजारीं एक अतिथिगृह आणि इतर सुखसोयी ह्यांचीही व्यवस्था करण्यांत येणार आहे.

**पाकिस्तानमधील पोलादाचा धंदा**—पश्चिम व पूर्व पाकिस्तानांत पोलादाचा धंदा काढणें कितपत शक्य आहे तें अजमविण्यासाठी अमेरिकन धंदेवाल्यांचें एक मंडळ पाकिस्तानांत गेलें होतें. मंडळाचा दौरा आतां पुरा झाला असून १७ डिसेंबर पूर्वी तें आपला अहवाल सादर करणार होतें. पाकिस्तानांत सर्व दृष्टींनीं परिपूर्ण असा पोलादाचा धंदा उभारण्याची फारशी शक्यता नाहीं असें समजतें. कारण, पोलाद तयार करण्यासाठीं लागणारा उत्तम प्रतीचा कोळसा पाकिस्तानांत उपलब्ध नाहीं.

**कांचेचा कारखाना बंद झाला**—रामनगर येथील विभूति ग्लास वर्क्स हा कारखाना बंद करण्यांत आल्यानें ४०० मजूर बेकार झाले आहेत. कारखान्याची भट्टी धोकादायक झाल्यामुळें काम बंद ठेवणें भाग होतें, असें कारण चालकांनीं दाखविलें आहे. तथापि अधिक चौकशी करतां, कारखान्यांत ८,००,००० रुपयांचा माल पडून आहे असें कळतें. हा माल खपल्याशिवाय कारखाना चालू होण्याची शक्यता दिसत नाहीं. कारखान्याच्या कामगारांना १२ दिवसांचा पगार देण्यांत आला.

**मद्रास प्रांतांतील फोनोग्राफचा धंदा**—ग्रामोफोनच्या तबकड्या करण्याचा मद्रास प्रांतांतील धंदा डबघाईला आला आहे. सरकारनें मदत केली नाहीं तर ८–१० वर्षांत हा धंदा कायमचा बंद होण्याचा संभव आहे. रेडिओ आणि सिनेमा ह्यांच्या प्रसारामुळें धंद्यावर अनिष्ट परिणाम झाला आहे. हिंदी भाषेला उत्तेजन देण्याच्या सरकारच्या धोरणास अनुसरून हिंदीचे धडे देणाऱ्या सात तबकड्याही काढण्यांत आल्या होत्या. परंतु त्यांच्यापेक्षां सिनेमांतील गाणीं मुद्रित केलेल्या तबकड्याच अधिक खपतात असा अनुभव आला आहे.

**भारतांतील विजेच्या गाड्या**

भारतीय रेल्वेंवर एकूण २३५ मैलांचा विजेचा मार्ग खालीलप्रमाणें आहे.

एस. आय. आर. ( मद्रास बीच ते तामबारम् ) १८.१४ मैल.

जी. आय. पी. ( मुंबई ते पुणें आणि कल्याण ते इगतपुरी ) १८१.०५ मैल.

बी. बी. ॲण्ड सी. आय. (चर्चगेट ते विरार) ३६.८० मैल.

**ऑक्टोबर १९४९ मध्यें सोडलेल्या खास मालगाड्या**

ऑक्टोबर, १९४९ मध्यें भारतीय रेल्वेंवर ३३५ खास मालगाड्या सोडण्यांत आल्या. त्यांपैकीं महत्वाच्या गाड्या पुढीलप्रमाणें आहेत:—

| कोणत्या मालासाठी | गाड्या |
|---|---|
| सर्वसाधारण माल | १०७ |
| मीठ | ५७ |
| अन्नधान्यें | ४१ |
| सीमेंट | १५ |
| बटाटे | २१ |
| अशुद्ध मँगनीज | ४३ |
| लोखंड आणि पोलाद | ५ |
| सूत व कापड | ३ |

**" परदेशी प्रवाशांचा " धंदा**

ग्रेट ब्रिटनमध्यें परदेशी प्रवाशांची सोय कशी बघण्यांत येते, त्याचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी भारत सरकारनें श्री. के. सी. सेन ह्यांना मुद्दाम पाठविलें होतें. ग्रेट ब्रिटनप्रमाणें युरोपांतील देशांतहि ते जाऊन येणार आहेत. दिल्ली येथें नॅशनल ट्रॅव्हल एजन्सीचें मध्यवर्ती केंद्र ठेऊन त्याच्या मद्रास, कलकत्ता व मुंबई येथें प्रादेशिक शाखा स्थापण्याचा भारत सरकारचा विचार आहे, असें त्यांनीं एका मुलाखतींत सांगितलें. ग्रेट ब्रिटनमधील नमुन्यावरच प्रवाशांचा धंदा येथेंहि उभारण्यांत येईल, असें प्रसिद्ध झालें आहे. १९४९ सालअखेर सुमारें ५,६०,००० परदेशीय प्रवासी ग्रेट ब्रिटनमध्यें येऊन जातील व जातांना ५½ कोटी पौंड मागें ठेऊन जातील असा अंदाज आहे.


**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

शेड्यूल्ड बँक ★ स्थापना १९३५

वसूल झालेलें भांडवल रु. १६,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड रु. ४,३०,०००
एकूण खेळतें भांडवल रु. ३। कोटीचे वर

बँकेनें कोल्हापूर व द. हैद्राबाद येथें शाखा उघडल्या आहेत. त्याचा जनतेनें फायदा घ्यावा.

मुख्य कचेरी लक्ष्मी रोड, पुणें २. | सी. व्ही. जोग मॅनेजर



# अर्थ

बुधवार, ता. २१ डिसेंबर, १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे.

संपादक :
श्रीपाद वामन काळे.


## अवमूल्यनानंतरची परराष्ट्रीय हुंडणावळ

ग्रेट ब्रिटननें सुचविल्याप्रमाणें, इंटरनॅशनल मॉनेटरी फंडानें पौंडाच्या नव्या किंमतीस मान्यता दिल्याचें फंडाच्या कचेरीनें रविवार, ता. १८ सप्टेंबर १९४९ रोजीं सायंकाळीं ४–३० (वॉशिंग्टन टा.) जाहीर केलें. १ पौंड = ४·०३ डॉलर हा जुना हुंडणावळीचा दर होता, तो २·८० डॉलर करण्यांत आला. सोन्याच्या भाषेंत, नव्या दरानें १ पौंड = २·४८८२८ ग्रॅम सोनें असा हिशेब झाला. पश्चिम आफ्रिका, द. ऱ्होडेशिया, सायप्रस, जिब्राल्टर, माल्टा, मॉरिशस, फिजी, मलाया, सारावाक, इत्यादींच्या चलनांचे बाबत ग्रेट ब्रिटननें फंडाचे नियम मान्य केले होते, त्यांच्या चलनांच्या ह्याच प्रमाणांतील अवमूल्यनासहि फंडानें मान्यता दिली. स्टार्लिंग गटांतील इतर देशांनींहि ग्रेट ब्रिटनचें अनुकरण केलें. पाकिस्ताननें मात्र आपल्या रुपयाची डॉलरमधील किंमत कायम राखली; त्या कारणानें पूर्वीं पाकिस्तानी १ रुपया = १ शि. ६ पे. अशी हुंडणावळ होती, ती आतां १ रुपया = २ शि. १$\frac{१}{१६}$ पे. अशी सहाजीकच झाली. इजिप्त, डेन्मार्क, फिनलंड, आइसलंड, नॉर्वे, स्वीडन, इत्यादि स्टार्लिंग गटाबाहेरील देशांनींहि पौंडाच्या बरोबरीनें आपल्या चलनाची डॉलरमधील किंमत उतरविली; म्हणजे आपल्या चलनाचें पौंडाशीं नातें कायम राखलें. इतर कित्येक देशांनीं चलनाचें अवमूल्यन केलें, परंतु तें पौंडाप्रमाणें ३०½% इतकें मात्र नाहीं. अवमूल्यन मुळीच न केलेले प्रमुख देश म्हणजे अमेरिका, मध्य व दक्षिण अमेरिकेंतील देश, ऑस्ट्रिया, स्वित्झरलंड, इराण, रशिया व त्याचे कक्षेंतील देश, हे होत. "एकॉनॉमिस्ट"नें आपल्या आंतरराष्ट्रीय बँकिंगच्या ताज्या आढाव्यांत, पौंडाच्या अवमूल्यनामुळें आंतरराष्ट्रीय हुंडणावळीचें पालटलेलें स्वरूप स्पष्ट करून दाखविलें आहे. इतक्या थोड्या काळांत एवढा मोठा बदल ह्यापूर्वीं घडून आला नव्हता. खालील तक्त्यांत अवमूल्यनापूर्वींचे व नंतरचे हुंडणावळीचे दर दिले आहेत.

### पौंडाच्या चालीनें गेलेलीं चलनें: ३०½ % अवमूल्यन

खालील देशांनीं डॉलरमधील आपल्या चलनांची किंमत ३०½% कमी करून, पौंडांतील किंमत पूर्ववत राखली आहे:— ग्रेट ब्रिटन, द. अफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, हिंदुस्थान, सिलोन, बर्मा, आयरा, इराक, इजिप्त, आइसलंड, इस्रायल, हॉलंड, डेन्मार्क, फिनलंड, नॉर्वे, स्वीडन, ग्रीस.

### ३०½% पेक्षां कमी अवमूल्यनाचीं चलनें

खालील यादींत कंसांमध्यें अवमूल्यनाचें प्रमाण दिलें आहे:— कॅनडा (९·१ %), बेल्जम (१२·३%), फ्रान्स (२२·२ %) इटली (८·१ %), पोर्तुगाल (१३·३ %), सयाम (२०·०%) प. जर्मनी (२०·७ %)

### डॉलरमधील किंमती पूर्ववत असणारीं चलनें

खालील यादींतील देशांच्या चलनांची डॉलरमधील किंमत कायम आहे; सहाजीकच त्यांच्या चलनांचे मानानें पौंडाचें अवमूल्यन ३०½% झालें आहे:—

ऑस्ट्रिया, बोलीव्हिया, ब्रॅझील, ब्रि. होंडुरास, कोलंबिया, कोस्टारिका, क्युबा, चेकोस्लोव्हाकिया, डोमि. रिपब्लिक, डच वेस्ट इंडीज, इक्वेडॉर, एथिओपिया, फ्रें. सोमालीलँड, ग्वाटेमाला, हायटी, होंडुरास, हंगेरी, इराण, जपान, लेबेनॉन, लायबेरिया, निकाराग्वे, पनामा, पॅराग्वे, पाकिस्तान, पेरू, फिलिपाइन्स, पोलंड, पोर्टोरिको, रुमानिया, सल्व्हेडार, स्वित्झरलंड, सिरिया, टँजीर, टर्की, यु. एस. ए., यू. एस. एस. आर., वेनेझुएला, युगोस्लाव्हिया.

युद्धकाळांत व युद्धोत्तर काळांत परराष्ट्रीय व्यापारांत येणाऱ्या प्रतिकूल तफावतीस आळा घालण्याच्या उद्देशानें ग्रेट ब्रिटन प्रभृति देशांनीं आपल्या चलनांच्या डॉलरमधील किंमती उतरविल्या. डॉलर चलनाच्या दुर्मीळतेमुळें त्यांना ह्या उपायाचा अवलंब करणें भाग पडलें. ह्यामुळें, त्यांची डॉलर गटांतील देशांकडे निर्गत किती वाढते हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. हिंदुस्थाननें आपली निर्गत वाढविण्याचा प्रयत्न चालविला आहे. परंतु त्याच्या मार्गांत अनेक अडचणी आहेत. योग्य किंमत, चांगला माल, ह्यांचे बरोबरच अमेरिकाप्रभृति डॉलर गटांतील देशांचें परराष्ट्रीय व्यापारासंबंधांत इतरांस अनुकूल धोरण, ह्यांचीहि अर्थातच आवश्यकता आहे.

---

## पाकिस्तानमधील तागाचा धंदा बसणार ?

हिंदुस्थान सरकारनें रुपयाचें अवमूल्यन केलें; परंतु पाकिस्ताननें तसें केलें नाहीं. त्यामुळें हिंदनें पाकिस्तानपासून ताग न घेण्याचा निर्णय घेतला. हिंदुस्थान सरकारच्या ह्या धोरणामुळें पाकिस्तानमधील ताग पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची अनुकंपनीय स्थिति झाली आहे.

हिंदच्या भागांतील गिरण्यांशीं तागाबद्दल कांहीं तरी समझोता झाला नाहीं तर पूर्व पाकिस्तानजवळ सुमारें १५ लाख तागाच्या गाठी ह्या हंगामाअखेर पडून रहातील आणि तागाच्या शेतकऱ्यांचें फार मोठें नुकसान होईल. शेतकऱ्यांना पूर्व पाकिस्तान सरकारनें आश्वासनें दिलीं आहेत ही गोष्ट खरी आहे. तथापि बिन सरकारी गोटांत मात्र तागाच्या धंद्याच्या भवितव्याबद्दल साशंकता व्यक्त करण्यांत येत आहे. पूर्व पाकिस्तान सरकारनें कायद्याप्रमाणें ठरलेल्या किंमतीला वाटेल तेवढा ताग घेण्याचें कबूल केलें आहे. ह्या कबुलीमुळें अंगावर घेतलेली आर्थिक जबाबदारी तर मोठी आहेच परंतु तागाच्या साठवणुकीचा प्रश्न सोडविणें सुद्धां अशक्य होत चाललें आहे. हिंदी गिरण्यांनीं आपला विचार बदलून पाकिस्तान सांगत असलेल्या किंमतीला ताग घेण्याचें ठरविलें तरच ठीक. पण हिंदी गिरण्यांचें धोरण बदलण्याची आशा फारच थोडी आहे.

अशा परिस्थितींत पूर्व पाकिस्तान सरकारनें, खाजगी व्यापाऱ्यांनीं ताग विकत घेण्याच्या सरकारच्या कार्यक्रमांत सामील व्हावें, असा प्रयत्न चालविला आहे असें समजतें. ह्या कार्यक्रमाप्रमाणें तागाच्या शेतकऱ्याला एक किमान किंमत देण्याची व्यवस्था केलेली आहे. तागाच्या खरेदीची ही योजनाच मुळीं व्यापारी दृष्टीनें अव्यवहार्य आहे असें म्हणतात. अर्थातच खाजगी भांडवल ह्या योजनेला हातभार लाऊं लागेल, असा संभव अत्यल्प आहे.

पुढील वर्षाच्या हंगामाचे आधीं हिंदुस्थानशीं कांहीं करार न झाल्यास पूर्व पाकिस्तानांत तागाची लागवड कमी होऊन तांदुळाची लागवड वाढण्याचा संभव आहे. तागाच्या लागवडींत घट झाल्यानें सुमारें ३९ लाख गाठी कमी उत्पन्न होतील आणि त्यामुळें पाकिस्तानचें परराष्ट्रीय हुंडणावळीचें उत्पन्न बरेंच कमी होईल.

('एक्सपोर्ट ट्रेड आणि शिपर'च्या आधारें)

### अमेरिकेंतील दरिद्री (?) कुटुंबें

अमेरिकन विधिमंडळांच्या आर्थिक अहवाल—विषयक कमिटीसाठीं माहिती गोळा करून देणारें एक पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. ह्या माहितीचा उपयोग देशांतील सर्व सामान्य माणसाची आर्थिक परिस्थिति आणि तज्जन्य परिणाम ह्यांचा अभ्यास करण्यासाठीं होणार आहे. अमेरिकेंत १९४८ सालीं ८० लाख अमेरिकन कुटुंबांना अगर नागरिकांना १,००० डॉलर्सपेक्षां कमी प्राप्ति झाली असें वरील पुस्तकांत नमूद करण्यांत आलें आहे. इतक्या कमी (?) उत्पन्नांत भागविणारीं कुटुंबें कशी रहातात, त्यांच्यांत गुन्हेगारीचें प्रमाण अधिक आहे किंवा काय, त्यांच्या मुलाबाळांची काय व्यवस्था होते आणि त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं काय करतां येण्यासारखें आहे, इत्यादि प्रश्नांचा मुद्दाम अभ्यास करण्यांत येणार आहे.

सुमारें १९ वर्षांपूर्वी मरहूम प्रे. रूझवेल्ट ह्यांनींही एका भाषणांत अमेरिकेंतील आर्थिक दैन्याविषयीं खेदाचे उद्गार काढले होते. आजही तीच परिस्थिति थोड्या बहुत फरकानें चालूच आहे. अमेरिका उत्पादन साधनांच्या खाजगी मालकी हक्काचें माहेरघर आहे. अर्थातच केवळ भांडवली अर्थव्यवस्थेच्या पायावर सुबत्ता नांदूं शकेल कीं नाहीं ह्या प्रश्नाचा तात्त्विक विचार अमेरिकेच्या अनुभवावरून कसोटीस उतरण्यासारखा आहे, असें समजण्यास हरकत नाहीं. प्रे. रूझवेल्ट १९ वर्षांपूर्वी असें म्हणाले होते कीं, अमेरिकन जनतेपैकीं एक तृतियांश लोकांना खायला पुरेसें अन्न नाहीं, रहायला चांगलीं घरें नाहींत आणि पेहेरण्याला नीटनेटके कपडे नाहींत. त्यावेळीं ब्यूरो ऑफ लेबर स्टॅटिस्टिक्स आणि नॅशनल रिसोर्सेस कमिटीनें आर्थिक परिस्थितीची माहिती गोळा केली होती. १९३० सालीं म्हणजे मंदीच्या काळांत अमेरिकन कुटुंबांपैकीं एक तृतियांश कुटुंबांचीं वार्षिक उत्पन्नें ७५० डॉलर्सच्या खालीं होतीं आणि जवळ जवळ निम्म्या कुटुंबांचीं उत्पन्नें १,००० डॉलर्स पेक्षां कमी होतीं. आज अमेरिकेचें राष्ट्रीय उत्पन्न १९३० सालच्या मानानें ४०० टक्के अधिक झालेलें आहे, ही गोष्ट खरी पण त्याचबरोबर डॉलर्सची वस्तूच्या स्वरूपांतील किंमतही घटली आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. उत्पादनसाधनांची सार्वजनिक मालकी आणि खाजगी मालकी ह्या दोन प्रकारच्या आमूलाग्र भिन्न अर्थव्यवस्थांत आज स्पर्धा चाललेली जगभर दिसून येत आहे. १९३० नंतर जवळ जवळ २० वर्षांत अमेरिकेनें फारशी प्रगति केलेली नाहीं ?

**यांत्रिक हत्यारांचा धंदा**—यांत्रिक हत्यारें तयार करणाऱ्या हिंदुस्थानांतील कारखान्यांना बिकट परिस्थितीला तोंड द्यावें लागेल अशीं लक्षणें दिसत आहेत. अशा प्रकारच्या बहुतेक कारखान्यांनीं आपलें उत्पादन कमी केलें आहे. म्हैसूर किर्लोस्कर कंपनीच्या मालाचा खप गेल्या पांच महिन्यांत घटला आहे. कंपनीचें तीन चतुर्थांश भांडवल न खपलेल्या मालांत गुंतून पडलें आहे. परदेशांतून मोठ्या प्रमाणांत आयात होणारीं यांत्रिक हत्यारें ह्या कारखान्यांना भोवत आहेत. ह्याशिवाय सरकार—पुरस्कृत यांत्रिक हत्यारांच्या कारखान्याचीही भीति आहेच.

## भारतांतील मालाच्या घाऊक किंमती

आर्थिक सल्लागारांच्या अधिकृत परिमाणानुसार २६ नोव्हेंबर १९४९ रोजीं संपलेल्या आठवड्यांत भारतांतील मालाच्या घाऊक किंमतींत ०·२ टक्क्यानें घट झाल्याचें दिसून येतें. या आठवड्याचा निर्देशांक ३८९·७ असून (मूळ प्रमाण १९३९ ऑगस्टला संपलेलें वर्ष = १००) तो गेल्या महिन्यांतील याच आठवड्याच्या १·२ टक्क्यानें कमी परंतु गतवर्षीच्या याच आठवड्याच्या १·६ टक्क्यानें अधिक आहे. नोव्हेंबर महिन्याची सरासरी ३९०·२ पडली असून हीच सरासरी गेल्या महिन्यांत ३९३·३ आणि १९४८ च्या नोव्हेंबर महिन्यांत ३८२·२ अशी होती.

वस्तूंच्या समूहांच्या व उपसमूहांच्या घाऊक किंमतीचा तक्ता पुढीलप्रमाणें आहे:—

(मूळ प्रमाण=ऑगष्ट १९४९ ला संपलेल्या वर्षातील निर्देशांक = १००)

| मालाचा विभाग | मासिक सरासरी | | |
|---|---|---|---|
| | नोव्हेंबर १९४९ | ऑक्टोबर १९४९ | नोव्हेंबर १९४८ |
| १. खाद्यपदार्थ | ४०५·१ | ४०६·८ | ३९४·१ |
| (१) खाद्य धान्यें | ४६० | ४६५ | ४८१ |
| (२) डाळी | ३९८ | ४०३ | ४६२ |
| (३) इतर पदार्थ | ३२४ | ३२२ | २६६ |
| २. औद्योगिक कच्चा माल | ४७२·४ | ४७७·९ | ४४०·३ |
| (१) तंतुमय पदार्थ | ४५७ | ४५१ | ४२९ |
| (२) गळिताचीं धान्यें | ५९७ | ६४४ | ५४५ |
| (३) खनिज पदार्थ | ३३६ | ३२९ | ३१० |
| (४) इतर पदार्थ | ३६१ | ३५२ | ३५७ |
| ३. अर्ध—पक्का माल | ३३३·९ | ३३२·२ | ३४१·० |
| (१) कातडीं | ३३२ | ३२२ | ३०१ |
| (२) खनिज तेलें | १९५ | १८३ | १८१ |
| (३) वनस्पती तूप | ६५० | ६६८ | ५६० |
| (४) कापसाचें सूत | ४१२ | ४२३ | ५१५ |
| (५) धातू | १८१ | १७६ | १७० |
| (६) पेंड | ४१६ | ४१६ | ३९५ |
| (७) इतर पदार्थ | २७० | २५४ | २६० |
| ४. पक्का माल | ३४४·२ | ३५२·६ | ३४५·८ |
| (१) कापसाचें कापड | ३९३ | ४०९ | ४११ |
| (२) ताग | ५६१ | ५६१ | ५२७ |
| (३) कापूस | ३५८ | ३७३ | ३५९ |
| (४) रेयॉन आणि रेशिम | ४६१ | ४६४ | — |
| (५) लोकरी कपडा | २८२ | २८३ | २८४ |
| (६) धातूंच्या वस्तू | २७२ | २७२ | २४० |
| (७) इतर पदार्थ | २७१ | २७० | २६९ |
| ५. संकीर्ण वस्तू | ६१२·० | ५८८·८ | ५४८·० |
| ६. सर्व माल | ३९०·२ | ३९३·३ | ३८२·२ |

## जाहिरातीच्या एजन्सीज आणि त्यांची विपन्नावस्था

( लेखकः—श्री. त्र्यं. रा. अभंग, सातारा )

वर्तमानपत्रांच्या—नियतकालिकांच्या जगांत ज्या गोष्टींना विशेष महत्त्व आहे त्यांत जाहिरात म्हणजे वृत्तपत्राच्या पंचप्राणापैकीं एक इतकें तिला महत्त्व आहे असें कोणताहि छोटा-मोठा वर्तमानपत्रकार कबूल करील यांत शंका नाहीं. आणि हें काम जितक्या मोठ्या प्रमाणावर ठिकठिकाणांहून कार्यक्षम पद्धतीनें होईल तितकें हवेंच असतें. आणि यांतूनच तें काम करण्याकरितां ठिकठिकाणीं जाहिरातीचे एजंटस अथवा प्रतिनिधी नेमणें उपयुक्त ठरून पगार अथवा कमिशन पद्धतींवर निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे लोक वृत्तपत्रकर्त्यांनीं—नियतकालिककार याच अर्थानें हा शब्द मी येथें लिहीत आहे, कारण तो बहुसंख्य वाचकांना पटण्यासारखा आहे—नेमले आणि ते आजवर आपापलें काम स्वतंत्रपणें जबाबदारीनें करीतहि होते, व आहेतहि. या नित्यक्रमास जबरदस्त टोला बसला व त्यायोगें छोट्या छोट्या प्रतिनिधींची कमालीची दुस्थिति झाली, किंबहुना त्यांना धंद्यांतून उठण्याची वेळ आली ती दिल्लीच्या दि इंडियन अ‍ॅन्ड ईस्टर्न न्यूजपेपर सोसायटीच्या नियमावलीच्या योगें आणि आपल्या इकडील मोठ्या वृत्तपत्रांनीं त्यांचें सभासदत्त्व स्वीकारून आपल्या सर्व जाहिरात एजंटांवर त्यांच्या नियमांचें बंधन घातल्यामुळें होय. सर्वांनींच तें सभासदत्त्व स्वीकारलें आहे असें नाहीं तर कांहीं मोठमोठ्या नियतकालिकांनीं तें अजूनहि स्वीकारलें नसून आपले नियम व कमिशन वगैरे पूर्ववत तसेंच चालूं ठेवले आहेत. आपली त्यायोगें होणारी कुचंबणा व दुरवस्था याबाबत समव्यवसायी एकत्र येतात तेव्हां बोलतात व विचारविनिमय करतात. पण त्या बाबतींत सर्वांची संघटना करून आपल्या गैरसोयी व कुचंबणा यांची वाच्यता, उहापोह करणें, व योग्य त्या अधिकाऱ्याकडे, संस्थेकडे ते सर्व मांडून ही परिस्थिति सुधारण्याचा कोणीहि प्रयत्न करूं शकला नाहीं.

या बाबतींत कोणी तरी सुरवात करून या विषयास चालना द्यावयास हवी व समव्यवसायिकांचें लक्ष वेधावयास हवें. निदान श्रीगणेशा तरी करावयास पाहिजे म्हणून मी माझ्या अनुभवाच्या आधारें या विषयावर लिहिण्याचा उपक्रम करीत आहें. नवीन नियमांचा अगदीं मोठ्यांत मोठा आघात झाला तो एजंटसना मिळावयाच्या मिळकतींत—कमिशनवर झाला. ज्यास्तींत जास्त ७५% घट करण्यांत आली आहे. याच्या उलट युद्ध व युद्धोत्तर काल यामुळें वाढत जाणारी महागाई, छपाई, साधनांची दुर्मिळता यायोगें जाहिरातीचे दर ४ पासून क्वचित १० पट वाढले आहेत आणि एजंटांनीं ती जबाबदारी मात्र आपण मिळविलेल्या कामासंबंधीं घ्यावयाची आहे. आणि जरा जास्ती मिळकत व्हावी असें वाटल्यास जादा काम मिळवावें त्याची मर्यादा इतकी अमर्याद ठेवण्यांत आली आहे कीं ती बहुसंख्य एजंटांच्या नजरेच्या टप्यांत देखील येणें शक्य नाहीं. याचें एकच उदाहरण, सोसायटीच्या नियमाप्रमाणें जास्तींत जास्त कमिशन मिळविण्याकरितां त्यांच्या मर्यादेइतकें अगर अधिक काम पाठविणाऱ्या संस्था अगर प्रतिनिधी अखिल भारतांत माझ्या माहितीप्रमाणें साठ देखील नाहींत; आणि कमींत कमी कमिशन मिळवणारे—जास्तींत जास्त काम न पाठवूं शकणारे—प्रतिनिधि कित्येक हजार आहेत. ते आज २०।२२ वर्षें हा धंदा निरनिराळ्या ठिकाणीं राहून पदेल तो खर्च करून, मेहनत घेऊन, जबाबदारी पत्करून करीत होते त्या सर्वांना आज इतक्या वर्षांच्या व्यावसायिक आयुष्यानंतर अन्नास मोताद होण्याची पाळी आली आहे.

वास्तविक पहातां वृत्तपत्राचे संपादक, सहसंपादक, कंपाझिटर, प्रुफरीडर, व्यवस्था खात्यांतील कार्यकर्ते आणि इतरहि स्थानिक व परस्थ कार्यकर्ते यांना वाढती महागाई लक्षांत घेऊन महागाई भत्ता, पगार वाढ, वगैरे गोष्टी बहुतेक सर्व कार्यालयांतून अमलांत आल्या असून जाहिरातीचें काम करणाऱ्या या महत्त्वाच्या घटकाकडे मात्र उलटा न्याय लागू झाला आहे. त्यांत पगार ( मिळकत=कमिशन ) वाढ नाहीं, महागाई भत्ता नाहीं, आणि जबाबदारी मात्र वाढत्या श्रेणीनें घ्यावी लागत आहे. इतकेंच नव्हे तर जाहिरातदारानें पैसे न दिल्यास सबंध बिलास एकटा एजंट जबाबदार असतो.

ही परिस्थिति त्रासदायक आहे. प्रतिनिधी कार्यक्षमतेनें काम करूं शकत नाहींत,काम वाढवूं शकत नाहींत असा कित्येक मोठ्या नियतकालिकांचाहि अनुभव आल्यावर ( वरील सोसायटीच्या नियमांत बसणारे ) कॅश डिस्काउंट कांहीं टक्के देण्याचें त्यांनीं ठरवून प्रतिनिधींवर कार्यक्षमता पहिली कायम टिकवून वाढहि करावी असें अपेक्षिलें गेलें. हा वाढ इतकी अत्यल्प आहे कीं, तिचा स्वीकार करणें त्याला सोईपेक्षा गैरसोयीचेंच वाटावें. पण धंदा तर करावयास हवाच. मग त्यांत एखादा पार्टी अयोग्य मिळाल्यास सर्वच कामावर पाणी पडायचें. बाकीचेहि सर्वच गेल्याबरोबर काम देत आहेत, बिलें दिल्याबरोबर पैसे देत आहेत, सर्व वृत्तपत्रांचे व्हाऊचर अंक व बिलें एकाच वेळीं येत आहेत व एकाच वेळीं एकाच हेलपाट्यांत काम संपवितां येत आहे असें नसून कोठे रकमेऐवजी त्यांचा माल घेऊन विकण्याची जबाबदारी घ्यावी लागते! ही जबाबदारी घेत असल्यामुळें तें काम त्यास मिळत असतें. कोठें माल तावडतोब विकला जाणें शक्य असतें, तर कोठें कैठें वर्ष वर्ष, तो माल पडून असतो; धीरें, धीरें विकला जात असतो, तर कोठें तो वसुलीकरितां दरमहा तारा करा नाहीं तर मिळकतीच्या दुप्पट तिप्पट प्रवास खर्च करून आपली जबाबदारी पुरी करा, असाहि त्याला व्याप करावा लागतो.

यांतहि कित्येक वेळां आनंदाचे आणि उत्साहाचे क्षण येतात, नाहीं असें नाहीं. ते जेव्हां आपली परिस्थिति समजावून सांगितल्यावर कित्येक छोट्या पत्रांकडून पहिल कमिशन अजिबात कमी न करतां वाढ करण्यांत येते तेव्हां! त्यांना खूप काम मिळवून द्यावेसें प्रतिनिधींना साहजिकच वाटतें. पण तें मात्र शक्य होतेंच असें नाहीं. मात्र उलट कमिशन जादा मिळून देखील त्यांना त्यांच्या कामाचे पैसे वेळेवर पाठवितां येत नाहींत. कांहीं मोठ्या खपाच्या नियतकालिकांनीं देखील आपले प्रतिनिधींचें कमिशन कमी केलें नाहीं आणि कांहींनीं तर कामाची कार्यक्षमता व विश्वासुपणा पाहून मूळ कमिशनमध्यें वाढ केली आहे. दुसरी एक महत्त्वाची बाजू उल्लेखावयाची झाल्यास, कांहीं जाहिरातदारांकडून एजंटांना बिल पोचतांच सर्व रक्कम मिळूं शकते आणि क्वचित क्वचित अ‍ॅडव्हान्सहि पुरेसा मिळूं शकतो. या अनुकूलतेबरोबरच एक प्रतिकूलताहि असते. तिचा उल्लेख केला पाहिजे. कित्येक मोठमोठे जाहिरातदार तुम्हीं किती कमिशन देतां? अथवा तुम्हीं कांहीं कमी दर देऊं शकता कां? असेंहि विचारतात आणि वाढतें व भरपूर काम मिळण्याच्या इच्छेनें प्रतिनिधीहि आपल्या मिळकतीमधील कांहीं भाग जाहिरातदाराला देतात हें आतां उघड गुपित आहे. पण कित्येक वेळां याची मर्यादा इतकी

सुटते कीं, पूर्वीच्या काळीं २१% कमिशन मिळत असल्यास ७½% तुम्हाला ठेवा व बाकी आम्हांला राहूं द्या अशीहि अपेक्षा केली जात असे. इतकेंहि करून मूळ भरपूर काम मिळण्याची अपेक्षा संपूर्ण दृष्टीआड ( सोयीस्करपणें ) केली जाऊन रिबेट ( कमिशन ) मात्र भरपूर द्यावें लागतें !

या सर्व बाबतींत टक्कर देत देत धंदा कार्यक्षमतेनें करावयाचा म्हणजे कशी तारेवरची कसरत आहे किंवा सुळावरची पोळी आहे तें अनुभविक जाणें. आणि अशांत एखादें काम असें येतें कीं, ज्याची तयारी एजंटकडे नसते. तो तीं कामाच्या अल्पतेमुळें व क्वचित् येण्यामुळें ठेवूंहि शकत नाहीं व तो तें स्वीकारूं शकत नाहीं व त्यामुळें येणाऱ्या ग्राहकाची नामर्जी होते. असो.

तेव्हां असा हा महत्त्वाचा व जबाबदार घटक वाया जाऊं नये, पूर्ववत् त्यानें आपलें काम कार्यक्षमतेनें वाढत्या श्रेणीनें मिळवून नियतकालिकांकडून भलें म्हणवून घ्यावें व एवढें होण्यास जितकें त्याचें जीवन सुखाचें व सोयींनीं युक्त व्हावें, एवढी मिळकत त्यास व्हावी. एवढी काळजी नियतकालिकांनीं व जाहिरातदारांनींहि घेणें जरूर आहे. एरवी अविश्वासु, कार्यक्षमतारहित, अशा एजंटांची मिळकत वाढवा असा आग्रह कोणीहि करणार नाहीं व तेंच योग्य होय.

---

**म्हैसूरमध्यें नवा कारखाना**—स्विटझरलंडमधील एका कंपनीच्या मदतीनें यांत्रिक हत्यारांचा एक कारखाना काढण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. कारखान्याचें भांडवल १६ कोटी रुपये असेल आणि त्यापैकीं १० टक्के स्विस कंपनी घालणार आहे. दहा वर्षांच्या काळांत, कारखान्यांतील यांत्रिक कामाच्या जागांपैकीं निदान ८५ टक्के जागा हिंदी लोकांना देण्याच्या दृष्टीनें शिक्षणाची व्यवस्था करण्यांत येणार आहे. कारखान्यासाठीं म्हैसूरला जागा घेण्यांत येत असून १९५० सालीं कारखान्याच्या उभारणीला प्रारंभ होईल.

**अफगाणिस्तानला कर्ज**—एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेनें अफगाणिस्तानला जास्तींत जास्त २,१०,००,००० डॉलर्स कर्ज देण्याला मंजुरी दिली आहे. ह्या कर्जाचा उपयोग धरणें आणि पाटबंधारे बांधण्यासाठीं लागणारी यंत्रसामुग्री, इतर माल आणि तज्ज्ञांची मदत इत्यादी मिळविण्यासाठीं करण्यांत येणार आहे.

**स्टॅलिनला ग्रहमालेची भेट**—जर्मनींतील जेना येथील कामगारांच्या मालकीच्या एका कांच कारखान्यानें मा. स्टॅलिन यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रहमालेचा एक नमुना भेट म्हणून द्यावयाचें ठरविलें आहे. ही ग्रहमाला स्टॅलिनग्राडला उभारण्यांत यावी अशी कामगारांची इच्छा आहे. मा. स्टॅलिन ह्यांना आज, २१ तारखेला ७० वें वर्ष पूर्ण होत आहे.

**हॉलिवुडचा परदेशी पसारा**— अमेरिकेंतील बोलपट निर्माते १९४९ सालीं २० पेक्षां अधिक चित्रपट परदेशांत तयार करीत होते. त्यापैकीं १२ बोलपट पूर्ण झाले आहेत. स्थानिक वातावरण निर्माण करण्यासाठीं म्हणून, हिंदुस्थान, इंग्लंड, इटली, जर्मनी, फ्रान्स आणि अर्जेंटायना इतक्या देशांतून अमेरिकन कंपन्या बोलपट काढीत होत्या.

**सीलोनमध्यें तयार घरांचा कारखाना**—सीलोन सरकार तयार घरें बनविण्याचा एक कारखाना काढण्याच्या विचारांत आहे. कारखाना काढण्यासाठीं दिल्लीहून एक तज्ज्ञ मुद्दाम कोलंबोला गेला होता. ह्या तज्ज्ञानें कारखान्यासाठीं लागणारा कच्चा माल कोठून व कसा मिळेल ह्याची पहाणी केली आहे. कारखाना उभारण्यास सरकारला सुमारें १० लाख रुपये खर्च येईल.


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

---

## महाराष्ट्र सहकारी विद्यालय

### पुणें

या विद्यालयाचे वर्ग ता. ३ जानेवारी १९५० पासून नं ५ बैरामजी जीजीभाई रोड, पुणें १ येथें सुरू होणार आहेत या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असि. को. ऑफिसर, खरेदी विक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून 'को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा' मिळविणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठी विशेष पसंती देण्यांत येते. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी संस्था व खातें येथील नोकरवर्गास प्रवेश दिला जातो. उमेदवारांनीं ता. २५ डिसेंबर १९४९ च्या आंत अर्ज करावे.

बा. वि. कुंभारे,
सुपरिन्टेन्डेन्ट.

---

## बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

मध्यम वर्गीयांना मासिक उत्पन्नांतून एका रकमेनें मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवत नाहीं. दरमहा ५ रु. नियमित शिल्लक टाकल्यास पांच वर्षांत ३०० रुपये स्वतःचे होतात. अशा बचत योजनेच्या रकमेवर ३ टक्क्यापर्यंत व्याज मिळण्याची सोय.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

जास्त माहितीसाठी मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.

मुख्य कचेरी:–४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

स्थानिक शाखा:–( १ ) भवानी पेठ. ( २ ) सदाशिव पेठ.

बाहेरगांवच्या शाखा:– (१) टिळक चौक, सोलापूर, (२) वखार भाग, सांगली.

## कंपन्यांचे वार्षिक अहवाल

### दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें

वरील कंपनीनें ३० सप्टेंबर, १९४९ अखेर संपलेल्या वर्षी ४६,५६,२५४ रुपयांची साखर विक्री केली. एकूण उत्पन्न ४९,०४,१४९ रुपये झालें. घसारा ( ८९,९९७ रु.) व मॅनेजिंग एजंटांचें कमिशन ( १२,३५२ रु. ) वजा जाता, अहवालाचे वर्षी सिंडिकेटला १,४२,०४७ रु. नफा झाला. प्रेफरन्स भागांस ५% व ऑर्डिनरी भागांस १०% डिव्हिडंड देण्यास १,१४,२२५ रु. लागतील. "म. गांधींच्या दुःखद वधानंतरच्या दंगलीमुळें गतवर्षी गळिताचा हंगाम ऑगस्ट, १९४८ अखेर पर्यंत चालू ठेवावा लागला व प्रस्तुत वर्षाच्या गळित हंगामासाठीं लागणाऱ्या उसाची लागण पुरेशा मजुरांच्या अभावीं होऊं शकली नाहीं. त्यामुळें गळिताचा उंस कमी मिळाला. तशांत, गुंडांनीं कांहीं क्षेत्रांतील उंसास आग लावली. याशिवाय, हंगाम लांबल्यामुळें आवश्यक ती यांत्रिक दुरुस्ती करून अहवालाचे वर्षाचे गळितास उशीरा सुरवात झाली व गळित ऑगस्ट १९४९ पर्यंत चालू ठेवावें लागलें. लांबलेल्या हंगामाचा परिणाम साखरेचा उतारा कमी होण्यांत झाला आणि उसाचे क्षेत्रांतील घट यामुळें मागील वर्षापेक्षा अहवालाचे वर्षी साखरेचें उत्पादन कमी झालेलें आहे." सिंडिकेटनें १००० टन ऊंस रोज गाळणारी यंत्रसामुग्री मागविली, तिच्या यंत्रांची उभारणी करण्याचें काम हातीं घेतलें आहे. यंत्रांची उभारणी होऊन नोव्हेंबर १९५० मध्यें नवीन यंत्रांच्या साह्यानें साखर होऊं शकेल असा अंदाज आहे. ३० सप्टेंबर १९४९ रोजीं उभ्या असलेल्या उसाचें क्षेत्र २३४५ एकर आहे.

### असोसिएटेड होटेल्स ऑफ इंडिया लि.

ह्या कंपनीचीं हिंदुस्थानांत प्रमुख ठिकाणीं व पाकिस्तानांत पेशावर, रावळपिंडी, मरी व लाहोर येथें होटेलें आहेत, तीं सर्व चांगलीं चाललीं आहेत. कंपनीला गेल्या वर्षी ३,७६,७०७ रु. निव्वळ नफा झाला. एकूण उलाढाल ४,६२,७५९ रुपयांनीं कमी झाली, तरी निव्वळ नफा फक्त ६४,०४६ रुपयांनीं घटला आहे. " सरकारी मंत्री व परदेशांतून जाऊन आलेले सरकारचे प्रतिनिधी ह्यांनीं आमच्या दिल्लीमधील होटेलांस भेट देऊन त्यांनीं आपलें मत जरूर व्यक्त करावें. मोठेलीं भाडीं देऊन त्यांनीं युरोपांतील, अमेरिकेंतील होटेलांमधील ज्या खोल्या वापरल्या, त्यांचेशीं त्यांनीं आमच्या खोल्यांची अवश्य तुलना करावी " असें आग्रहाचें निमंत्रण कंपनीचे अध्यक्ष, सर उषानाथ सेन ह्यांनीं केलें आहे.

### दि आयुर्वेद रसशाळा पुणें लि.

वरील कंपनीनें ३१ मे, १९४९ अखेर संपलेल्या वर्षी ४,३६,८४६, रुपयांची विक्री करून १६,५८४ रु. निव्वळ नफा मिळविला. गेल्या सालचे ताळेबंदांतील २९,८३९ रु. तोटा आतां १४,५७८ रु. वर आला आहे. मजुरी वाढ व कच्च्या द्रव्यांची किंमत वाढ ह्यांच्या प्रमाणांत औषधांच्या किंमतींत वाढ होत नसल्यानें, सध्या नफ्याचें प्रमाण कमी पडत आहे.

### किर्लोस्कर बंधु लि.

वरील कंपनीस ३१ जुलै अखेर संपलेल्या वर्षी १,८५,१९९ रु. निव्वळ नफा झाला. करासाठी ६,९७,३७५ रु., मॅनेजिंग एजन्सी कमिशन २,२०,६४३ रु., कामगारांना बोनस २,१५,००० रु. ह्याप्रमाणें तरतूद करून ही नफ्याची रक्कम आली आहे. १२% डिव्हिडंडला १,८३,५०० रु. लागतील.

### चितळे ॲग्रि. प्रॉडक्टस लि.

३१ जुलै, १९४९ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीनें ११ लक्ष, ८४ हजार रुपयांची गूळविक्री केली. १ लक्ष, ६२ हजार रुपये अन्नधान्य, फळें इत्यादींच्या विक्रीपासून मिळाले. ६०,८८६ रु. घसारा काढून ८६,९७८ रु. निव्वळ नफा उरला. प्रेफरन्स शेअर्सवर ६% करमाफ व ऑर्डिनरी व नव्या ऑर्डिनरी शेअर्सवर ५% डिव्हिडंड सुचविण्यांत आलें आहे. कंपनीचें वसूल भांडवल १६,९४,२२५ रु. असून तिचे रिझर्व्ह व इतर फंड ६,९७,३८७ रुपयांचे आहेत. एकूण ताळेबंद ५४ लक्ष रुपयांचा आहे. कंपनीनें शेती व फॅक्टरी, ह्या दोन्ही खात्यांत वाढ केली असून कामगारांची पक्क्या इमारतींत रहाण्याची सोय केली आहे. वीज, नळाचें पाणी, जिमखाना, इत्यादि सोयीहि त्यांना उपलब्ध आहेत. बोर्डानें अहवालाचे वर्षी कु. वेणु दत्तात्रेय चितळे ह्यांना बोर्डावर को-ऑप्ट केलें. त्या आतां वार्षिक सभेंत निवडणुकीसाठीं उभ्या रहात आहेत. कु. वेणु चितळे ह्यांना इंग्लंडांतील व युरोपांतील संस्थांचा, संघटनांचा व व्यवहारांचा दीर्घकालीन अनुभव आहे. त्याचा व त्यांच्या ज्ञानाचा कंपनीस फायदा मिळणार आहे.

### कूपर एंजिनिअरिंग कंपनी लि.

१९४९ च्या जून अखेर पुऱ्या झालेल्या वर्षांत कूपर एंजिनिअरिंग लि. ह्या कंपनीला १,८१,७८० रुपये निव्वळ नफा झाला. गेल्या वर्षी १,५३,५६० रुपये नफा झाला होता. कंपनीच्या संचालकांनीं भांडवलांत झालेली ४,२०,००० रुपयांची वाढ लक्षांत घेऊन नफ्याचा दर ६ टक्क्यावरून ५ टक्के कर-माफ इतका कमी केला आहे.

### किर्लोस्कर इलेक्ट्रिक लि.

ह्या कंपनीच्या ३० जून १९४९ अखेरचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे. कंपनींत तयार होणाऱ्या इलेक्ट्रिक मोटर्सचा पुरेसा खप झाल्यास जानेवारी १९५० अखेर उत्पादन शिगेला पोंचेल असा अंदाज करण्यांत आला आहे. कंपनीला घसाऱ्याचा बोजा लक्षांत घेऊन ६,६९८ रुपये फायदा झाला असून तो पुढील वर्षांत ओढण्यांत आला आहे.

### जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि. चें वसूल भांडवल

वरील कंपनीच्या ताज्या अहवालाची माहिती " अर्था " च्या ता. १६ नोव्हेंबरच्या अंकांत दिलेली आहे. त्यांत कंपनीचें वसूल भांडवल ४½ लक्ष रुपये आहे, असें छापलें आहे. वास्तविक हा आकडा ६½ लक्ष रुपये पाहिजे. कंपनीनें ही चूक नजरेस आणून दिल्याबद्दल तिच्या चालकांचे आम्हीं आभारी आहों.

**पाईप आणि सिगारेट**-- पाइपमध्यें घालून ओढण्यांत येणाऱ्या तंबाखूच्या धुरांत सिगरेटमधील तंबाखूच्या धुरापेक्षां तिप्पट अधिक 'निकोटिन' हें विषारी द्रव्य असतें, असें सिद्ध करण्यांत आलें आहे.

बेडेकर
लोणचीं
वापरा

## पार्लमेंटांत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

हिंदुस्थान सरकार मध्य-प्रांतांत एक आणि ओरिसांत एक असे दोन पोलादाचे कारखाने उभारणार आहे. ह्या प्रत्येक कारखान्यास ९० कोटी रु. खर्च येणार आहे. दोहींपैकीं मध्यप्रांतांतील कारखाना प्रथम उभारण्यांत यावयाचा आहे. मध्यप्रांतांतील कारखान्यांत दरवर्षी ५,००,००० टन पोलाद निर्माण होईल. कारखान्यांसाठीं सल्ला घेण्यावर आतांपर्यंत ४ लाख रुपये खर्च झाले आहेत.

× × × ×

कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांतून हिंदुस्थाननें उघडलेल्या वकिलाती अगर तत्सम प्रतिनिधींसाठीं १९४८-४९ सालीं १७५ लाख रुपये खर्च झाले. ह्याशिवाय सरकारच्या इतर खात्यांचे प्रतिनिधी आणि नोकरवर्ग ह्यांच्यावर झालेला खर्च वेगळा आहे.

× × × ×

सिनेमागृहें अगर त्यासारख्या इतर प्रासादतुल्य इमारती बांधण्यास उत्तेजन न देण्याचें हिंद सरकारचें धोरण आहे. खेळासाठीं अगर कवायतीसाठीं बांधण्यांत येणाऱ्या स्टॅडिअमची मात्र वरील प्रकारच्या इमारतींत गणना केलेली नाहीं.

× × × ×

जानेवारी ते ऑगस्ट १९४९ पर्यंत हिंदुस्थानांत ३,८८,९३० टन पेट्रोल आणि ४,११,८६४ टन रॉकेल आयात करण्यांत आलें. १९४९ सालच्या पहिल्या आठ महिन्यांत खपलेल्या पेट्रोल आणि रॉकेलपैकीं ६·८ टक्के तेल हिंदुस्थानांत निर्माण करण्यांत आलें होतें.

× × × ×

३१ ऑक्टोबर, १९४९ रोजीं संपलेल्या सात महिन्यांत हिंदुस्थाननें निर्यातीपेक्षां १५०·४१ कोटी रुपये किंमतीच्या मालाची आयात अधिक केली. ह्या सात महिन्यांत हिंदुस्थाननें २२०·९१ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात केला आणि ३८१·२२ कोटी रुपये किंमतीचा माल आयात केला.


× × × ×

हिंदुस्थान सरकारनें १९४८-४९ सालांत आपल्या परदेशांतील वकिलातींसाठीं १,८१,९८,००० रुपये खर्च केले. १९४७-४८ सालीं हाच खर्च ७४,७२,००० रुपये झाला होता. १९४६-४७ सालीं म्हणजे फाळणी होण्याच्या पूर्वीच्या वर्षी १,३०,९१,००० रुपये खर्च झाले होते. समळयांत जास्ती खर्च अमेरिकेंतील वकिलाती आणि तत्सम इतर प्रतिनिधी मंडळांवर झाला. अमेरिकेच्या खालोखाल लंडनमधील वकिलातीवर खर्च झाला. १९४८-४९ सालीं लंडनमधील वकिलातीवर २३,०९,००० रुपये खर्च झाला. १९४७-४८ सालीं १६,६६,००० रुपये खर्च झाले होते. १९४८-४९ सालीं मॉस्को, पॅरिस व रंगून येथील वकिलातींसाठीं प्रत्येकीं सुमारें ८,००,००० रुपये खर्च करण्यांत आले.

× × × ×

चालू फडणिशी वर्षांत १२७ नवीन गाड्या हिंदुस्थान सरकारनें आपल्या मालकीच्या रेल्वे रस्त्यावरून चालूं केल्या. त्यापैकीं ८६ रुंद रुळावरून चालणाऱ्या असून ४१ अरुंद रुळावरून चालणाऱ्या आहेत. सप्टेंबर १९४९ अखेर संपलेल्या सहामाहींत रुंद रुळाच्या रेल्वेसाठीं २०२ नवीन एंजिनें दुर्लभ चलनाच्या देशांतून आयात करण्यांत आलीं. अरुंद रुळाच्या रेल्वेसाठीं ४ एंजिनें सुलभ चलनाच्या देशांतून आयात करण्यांत आलीं.

× × × ×


# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. २४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

**मुख्य कचेरी:-लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर**

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.